**एस.सी. सी. ११८६/२०१४**
**सरकार वि. उत्तम राठोड +४**
**साक्षीदार क्र. ०५, नि. क्र.७०**

साक्षीदाराचे नाव- कल्पना सुर्यकांत पदकोंडे
वय. ३९ वर्ष, उपजिवीका.- शिक्षण विस्तार अधिकारी
सध्या नेमणुक पंचायत समिती औरंगाबाद.

**पुढील सरतपास शपथेवर सरकारी पक्षातर्फे श्री.पी. आर. कुर्लेकर यांच्या मार्फत १.१० मिनीटांपासुन सुरु.**

**१.** मी कन्नड येथे शिक्षण विस्तार अधिकारी म्हणुन सन २०१४-१५ पर्यत कार्यरत होते. सदरची घटना दिनांक २१.०२.२०१४ ची आहे. त्या दिवशी माझी परिरक्षक (कस्टोडीयन)म्हणुन बोर्डाच्या परीक्षेसाठी नेमणुक झाली होती. त्यावेळी दहावी बारावीची बोर्डाची परिक्षा होती. परिरक्षक म्हणुन आमच्याकडे काही परिक्षाकेंद्र देण्यात येतात. आमचे काम असे असते की, परिक्षेचे जे प्रश्न पत्रीका असतात ते सिलबंद पेट्यांमध्ये आमच्याकडे येतात व ते आम्ही पोलिस ठाण्यात ठेवतो व परिक्षेच्या दिवशी ते सिलबंद पेट्या आम्ही परिरक्षक कार्यालय घेउन जातो. तेथुन परिक्षाकेंद्राचे प्रतिनीधी येउन आमच्याकडुन सिलबंद पेट्यांमध्ये असलेले सिलबंद प्रश्नपत्रीका घेउन जात असतात.

**२.** नक्की वेळ मला सांगता येणार नाही पण नेहमीप्रमाणे आम्ही पावणे नउ ते नउ वाजण्याच्या दरम्यान पोलिस ठाण्यात जात होतो. त्यादिवशी इंग्रजी विषयाची परिक्षा होती. त्यादिवशी नेहमीप्रमाणे आम्ही पोलिस ठाण्यात जाउन सिलबदं पेट्या आमच्या कार्यालयात आणल्या. त्यानंतर परिक्षा केंद्राचे संबधीत व्यक्तीनी कार्यालयात येउन सिलबंद प्रश्नपत्रीका आमच्याकडुन नेल्या. त्यादिवशी बरेच परिक्षा केंद्रे होती. प्रत्येकाची नाव आठवत नाही. परंतु आंबेडकर कॉलेज, जैतापुरचे कॉलेज, नागद, चिंचोली लिंबाजीचे कॉलेज इत्यादी त्यावेळी परिक्षाकेंद्रे म्हणुन होते. त्यावेळेसे केंद्र संचालक कोण होते हे मला आठवत नाही.

३. त्यावेळेस A, B, C, D असे एकाच विषयाच्या चार प्रश्न पत्रीका होत्या व एका सिलबंद पाकीटमध्ये २५ किंवा ५० प्रश्नपत्रीका असायच्या. जेव्हा परिक्षा केंद्राच्या संबधीत व्यक्ती आमच्याकडुन सिलबंद प्रश्नपत्रीका घेउन जात होत्या तेव्हा आम्ही आमच्या रजिस्टर मध्ये कोणी घेउन गेले, कुठले परिक्षा केंद्र, प्रश्न पत्रीका संचीका इत्यादी असे सर्व तपशिल नमुद करत होतो.

४. खरे तर आमच्याकडुन प्रश्न पत्रीका वाटप झाल्यानंतर आमची भुमिका संपते. परंतु त्यादिवशी मला तहसिलदार कार्यालयातुन फोन आला होता. त्यावेळेस तहसिलदार सुदळकर होते. त्यांनी मला माझ्या मोबाईलवर फोन केला होता. त्यांनी मला कळविले की, तेलवाडीच्या आश्रमशाळेवरती कॉपीचे प्रकरण झालेले आहे. मी लगेच आमचे प्रभारी गट शिक्षण अधिकारी सावळे मॅडम यांना याबाबत कळविले. सावळे मॅडमला सुध्दा तहसिलदार कार्यालयातुन फोन आलेला होता. मला तहसिलदार कार्यालयातुन फोन कधी आला होता हे निश्चित सांगता येणार नाही. परंतु अर्धा पेपर झाल्यावर फोन आला असावा व आम्ही तेथे पोहचलो तेव्हा १.४५ ची वेळ झालेली होती.

५. मी व गट शिक्षण अधिकारी तेलवाडी शाळेच्या समोर पोहचलो होतो. आम्ही जेव्हा पोहचलो तेव्हा तेथे खुप गर्दी होती. आम्हाला एक दुमजली घरामध्ये नेण्यात आले तेथे तहसिलदार, पोलिस व ईतर लोकं होती. तेथे प्रश्नपत्रीकेच्या छायांकित प्रती सापडल्या होत्या. तोपर्यंत परिक्षा संपलेला होता. आम्हाला मुलांकडुन मुळ प्रश्नपत्रीका घेउन मिळालेल्या छायांकित प्रश्नपत्रीकेशी तुलना करुन आमचे अभिप्राय मागीतलेले होते. आम्ही तसे करुन आमचा अभिप्राय दिला की, मुळ प्रश्नपत्रीका व छायांकित प्रश्नपत्रीका या सरख्या होत्या.

**प्रश्न.**तुम्हाला छायांकित प्रश्नपत्रीका दाखविल्यास ओळखु शकता का ?

**उत्तर.** वरचे मजकुर बघुन आम्ही प्रश्नपत्रीकेसंदर्भात सांगु शकतो. बरीच वर्ष झालेली आहे त्या विषयाच्या प्रश्नांन संदर्भात सांगता येणार नाही.

आता मला चार छायांकित प्रश्नपत्रीका दाखविण्यात आल्या. या छायांकित प्रश्नपत्रीकेव वर माझ्या व सावळे मॅडमच्या सहया आहेत. माझी तीन नंबरची सही आहे ती मी ओळखली आहे. प्रश्नपत्रीकेच्या प्रत्येक पानावरती माझी सही आहे. सदर छायांकित प्रश्नपत्रीकेला आर्टिकल ‘A,B,C,D’ देण्यात येत आहे.

६. पोलिसांनी आर्टिकल ‘A,B,C,D’ वरील छायांकित प्रश्नपत्रीके त्यांच्या ताब्यात घेतल्या. पोलिसांनी तेथे पंचनामा केला होता व माझी सही तेथे घेतली होती. आता मला तो पंचनामा दाखविण्यात आला तो तोच असुन त्यावर माझी अनुक्रमांक दोन वर सही आहे. ती मी ओळखली आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी ७१** देण्यात येत आहे. साक्षीदार स्वतःहुन सांगते की, पोलिस ठाण्यात आमच्या सहया घेतल्या.

७. मला मुळ प्रश्नपत्रीका दाखविल्यास मी ओळखु शकते. आता मला मुळ प्रश्नपत्रीका दाखविण्यात आली. तीन मुळ प्रश्नपत्रीका A,B,C असुन त्या बरोबर आहेत. या तीन मुळ प्रश्नपत्रीकेस अनुक्रमे 'E,F,G’ देण्यात येत आहे.

८. त्यावेळेस पोलिसांनी फोटो सुध्दा काढले होते. फोटो दाखविल्यास मी ओळखु शकते. आता मला आठ फोटोग्राफ दाखविण्यात आले. फोटोग्राफ बरोबर आहे त्या अनुक्रमे अर्टिकल ‘H १ ते ८ ' देण्यात येते. फोटो आर्टिकल ‘H १ व २ हे घराचे बाहेरुन फोटो काढण्यात आले आहे. ‘H ३ ते ६ हे घरातले फोटो आहेत. ‘H ७ व ८ मध्ये आमचे फोटो आहेत. त्यामध्ये आम्ही प्रश्नपत्रीका पडताळणी करत असताना दिसत आहे.

९. या प्रश्नपत्रीका तेलवाडी येथील वसंतराव नाईक माध्यमीक व उच्च माध्यमीक आश्रम शाळा येथे सापडल्या होत्या. ती शाळा (आरोपी क्र. १) यांची होती.

**<u>सरतपासात पुर्ण</u>**

<u>उलटतपास आरोपीचे विधीज्ञ श्री. पी.एफ. पाटणी यांच्याद्वारे सुरु</u>

**१०.** दिनांक २१.०२.२०१४ ला परिरक्षक म्हणुन माझी नेमणुक झालेली होती त्या संदर्भात मी कागदपत्रे पोलिसांकडे किंवा अभिलेखावर दाखल केलेले नाही. सन २०१४ साली मी कन्नड मध्ये राहत होते.

**११.** हे म्हणणे खरे आहे की, ज्या घरामध्ये आम्ही गेलो होते ते घर कॉलेजचे परिसर किंवा शाळेचे परिसर नव्हते.

**प्रश्न.** घर व परिक्षा केंद्र वेगळे होते, त्यांचा काही संबध नव्हता.

**उत्तर.** होय वेगळे होते.

**१२** परिक्षा केंद्र व घर यांच्यामध्ये किती अंतर होते हे मला निश्चित सांगता येणार नाही. साक्षीदार स्वतःहुन सांगते की, परिक्षा केंद्रा व घरामध्ये एक रोड होता व रोडच्या एका बाजुला परिक्षा केंद्र होते व दुस-या बाजुला घर होते. हे म्हणणे खरे आहे की, परिक्षा केंद्राला कपांउडवॉल होते. हे मला आठवत नाही की, परिक्षा हॉल व केंद्रामध्ये जाण्यासाठी एकच गेट होता.

**प्रश्न.** परिक्षा केंद्राला पोलिस बंदोबस्त देण्यात येतो ?

**उत्तर.** परिक्षा केंद्र संचालक सांगु शकतो.

**मध्यानाची वेळ झाली असल्यामुळे उलटतपास तहकुब करण्यात आला**

<u>उलटतपास मध्यांनातंर ३.२५ वाजता सुरु करण्यात आला.</u>

**१३.** हे मला आठवत नाही की, शाळा गावापासुन लांब किंवा गावाबाहेर होती किंवा नाही. हे म्हणणे खरे आहे की, त्या घरामध्ये एकही मुळ प्रश्नपत्रीका नव्हती.

**प्रश्न.** पोलिस ठाण्यातुन पेट्या देताना व त्यांच्या कडुन पेट्या घेताना पंचनामा केला होता का ?

**उत्तर.** रजिस्ट्रर मेंनटेन केले जाते.

**प्रश्न.** रजिस्ट्रर व्यतीरिक्त पंचनामा केला नव्हता?

**उत्तर.** रजिस्ट्रर होते पंचनामा केला नव्हता.

**प्रश्न.** पेठया ताब्यात घेताना त्यावर सिल होते किंवा नाही या संदर्भात नमुद केले आहे काय ?

**उत्तर.** रजिस्टवर होते.

**प्रश्न**. रजिस्टरवर  पेठया सिल केल्याचे नमुद आहे काय ?

**उत्तर.** रजिस्टमध्ये किती वाजता  पेट्या  देण्यात आल्या व घेण्यात आल्या हे नमुद असते.  पेट्या सिलच असतात. रजिस्टरमध्ये  पेट्या  सिलबंद होत्या या संदर्भात नोंद आहे काय हे मला सांगता येणार नाही. हे रजिस्टर आम्ही पोलिसांना तपासकामी दिलेले नाही.

**१४.** पोलिस ठाण्यातुन पेट्या घेउन मी परिरक्षक कार्यालयात आलो  व तेथे पेट्यांचे सिल उघडण्यात आले या संदर्भात आम्ही  लेखी नोंद केलेल्या नाहीत.

**प्रश्न**. परिक्षा केंद्राचे कोणती व्यक्ती प्रश्नपत्रीका घेण्यात येते, त्याबाबत शाहनिशा कशी करण्यात येते?

**उत्तर**. परिक्षेच्या पुर्वी बैठक घेण्यात येते. त्यामध्ये केंद्र संचालक त्यांनी नेमुण दिलेले व्यक्ती हजर असतात तशी आम्हाला ती व्यक्ती कळते.

**१५.** आमच्याकडे आमुक परिक्षा केंद्राचे अमुक व्यक्ती प्रश्नपत्रीका घेण्यात येईल असे लेखी दिलेले असते. तेलवाडी येथील परिक्षा केंद्राचे नेमुण दिलेले व्यक्ती संदर्भात अॅथोरेटी लेटर मी पोलिसांना दिलेले नाही.

**प्रश्न.** परिक्षा केंद्राच्या व्यक्तीला प्रश्नपत्रीका देताना त्या केंद्राला किती विद्यार्थी परिक्षा देणार आहे याची शहानिशा आपण केली का?

**उत्तर.** नाही,  बोर्डाकडुन आधीच माहीती आलेली असते.

**१६.** कोणत्या परिक्षा केंद्राला किती प्रश्नपत्रीका दयायची असते याची माहीती

आम्हाला आधीच आलेली असते.

**प्रश्न.** परिक्षा केंद्राच्या प्रतिनिधीला सिलबंद प्रश्नपत्रीकेचे पाकीट देताना ते सिलबंद आहे असे लेखी लिहुन घेतले का?

**उत्तर.** रजिस्टर मध्ये लिहीण्यात येते.

**प्रश्न.** रजिस्टरमध्ये पाकीट दिल्याची नोंद असते की, सिलबंद पाकीट दिल्याची नोंद असते?

**उत्तर.** ते पाकीट सिलबंदच असते.

**प्रश्न.** रजिस्टरमध्ये सिलबंद पाकीट घेतल्याची नोंद घेतली जाते काय?

**उत्तर**. ते पाकीट सिलबंदच असते.

पोलिसांकडुन पेट्या घेण्याचे व देण्याचे व परिक्षा केंद्राना सिलबंद प्रश्नपत्रीकाचे पाकीट दिल्या संदर्भात दोन वेगवेगळे रजिस्टर आहेत.

**प्रश्न**. तुमची जबाबदार पार पडावी म्हणुन तुम्हाला हे दोन रजिस्टर पोलिसांना दयावे असे वाटले नाही का?

**उत्तर**. पोलिसांनी मागणीच केली नाही.

**प्रश्न.** तुम्हाला दयावेसे वाटले नाही काय?

**उत्तर**. नाही.

**१७.** हे म्हणणे खरे नाही की, ते पाकीट कधीच सिलबंद नव्हते त्यामुळे तसा उल्लेख रजिस्ट्रमध्ये करण्यात आलेला नाही.

**१८.** बोर्डाने दिलेल्या परिक्षेचे मार्गदर्शक तत्वे मला माहीत आहे. हे म्हणणे खरे आहे की, संबधीत परिक्षा केंद्राने पाठविलेला वाहक हे परिक्षक कार्यालयातुन प्रश्नपत्रीका घेउन त्या परिक्षा केंद्रात घेउन जातात. ते वाहक कोण होते आता मला सांगता येणार नाही.

**प्रश्न.** प्रश्नपत्रीकेचे पाकीट परिक्षा केंद्राचे व्यक्ती घेउन जाताना वेळ नमुद केली जाते काय?

**उत्तर.** रजिस्ट्रमध्ये केली जाते.

**१९.** हे म्हणणे खरे आहे की, वाहकाने परिक्षा केंद्राच्या प्रमुखाला प्रश्नपत्रीकेचे पाकीट दिले त्याची वेळ सुध्दा नमुद केली जाते. बोर्डाकडुन अमुक विद्यार्थांना A, प्रश्नपकेचे संच देण्यात यावे व अमुक विद्यार्थाला B किंवा C किंवा D प्रश्नपत्रीकेचे संच देण्यात यावे असे काही सांगण्यात येत नाही. हे म्हणणे खरे आहे की, केंद्र प्रमुख कोणत्या विद्यार्थांना प्रश्नपत्रीकेचे A,B,C,D कोणते संच देण्यात यावे हे ठरविता येत नाही.

**२०.** हे म्हणणे खरे आहे की, परिक्षा केंद्रावर आमच्याकडुन नेलेले सिलबंद प्रश्नपत्रीकेचे पाकीट दोन विद्यार्थी व केंद्र प्रमुख यांच्यासमोर व त्यांच्या सहीनिशी डीसिल केले जाते. हे म्हणणे खरे आहे की, डीसिल केलेले पाकीट परत बोर्डाला पाठविले जाते. हे म्हणणे खरे आहे की, बोर्डाला डीसिल केलेले पाकीट पाठविताना किती प्रश्नपत्रीकाचे वाटप झाले व किती वापरण्यात आले व किती परत पाठविण्यात आले याचे ताळमेळ करुन अहवाल पाठविला जातो. हे म्हणणे खरे आहे की, एखादया डीसिल केलेल्या प्रश्नपत्रीकेच्या पाकीटामधुन जर काही प्रश्नपत्रीकेचा वापर झाला नसेल उदा. ५० प्रश्नपत्रीकच्या पाकीटातुन फक्त ४५ च विद्यार्थांना वाटप झाले तर उर्वरित पाच प्रश्नपत्रीका परत सिल करुन ते बोर्डात पाठविण्यात येतात. या केस एखादी प्रश्नपत्रीका कमी असल्याचे मला कोठेही आढळुन आले नाही.

**२१.** मी पोलिसांना असे सांगीतले होते की, '***आम्हाला मुलांकडुन मुळ प्रश्नपत्रीका घेउन मिळालेल्या छायांकित प्रश्नपत्रीकेशी तुलना करुन*** आमचे अभिप्राय मागीतलेले होते’. तसे पोलिसांनी माझ्या घेतलेल्या जबाबामध्ये का नमुद नाही याचे कारण मला सांगता येणार नाही. कोणत्या मुलांकडुन प्रश्नपत्रीका घेण्यात आले त्यांचे नाव किंवा सिट क्रमांक आम्ही नोंद केले नाही. तसेच ते विद्यार्थी परिक्षार्थी होते किंवा नव्हते याची शहानिशा आम्ही केली नाही. आमच्याकडे सदरच्या घटनेबाबत पर्यवेक्षक किंवा परिक्षा प्रमुखांची तक्रार आलेली नाही.

**प्रश्न.** परिक्षा केंद्रावर कोणताही गैरव्यवहार नव्हता असे म्हटले तर बरोबर होईल काय ?

**उत्तर.** मी सांगु शकत नाही.

हे म्हणणे खरे आहे की, माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परिक्षेच्या नियमावली नुसार एखाद्या परिक्षा केंद्रावर गैरव्यवहार होत असेल तर केंद्रप्रमुख किंवा पर्यवेक्षक यांनी बोर्डाला तक्रार देणे किंवा कळविणे अभिप्रेत आहे.

२२. हे म्हणणे खरे आहे की, मी ज्यावेळेस तिथे पोहचले त्यावेळी पोलिसांनी ज्या काही वस्तु व गोष्टी होत्या त्या ताब्यात घेतल्या होत्या. हे म्हणणे खरे आहे की, पोलिसांनी आम्हाला सांगीतले की, 'जे काही पेपर ताब्यात घेण्यात आले आहे ते ईथे मिळुन आले आहे.'

२३. मुळ प्रश्नपत्रीका ही बोर्डानेच दिलेली प्रश्नपत्रीका होती या संदर्भात मी विद्यार्थांकडुन घेतलेल्या प्रश्नपत्रीकेची चौकशी केली नाही अथवा पाहणी केली नाही. हे मला माहीत नाही की, उत्तर पत्रीका तपासणारे परिक्षक यांनी बोर्डाला कळविले होते की, अमुक उत्तरपत्रीकेमध्ये गैरव्यवहार दिसुन येतो. घरामध्ये असलेली छायांकित प्रश्नपत्रीका कोठुन आल्या, कशा आल्या, याची शहानिशा मी केलली नाही.

२४. हे म्हणणे खरे नाही की, जे काही जप्त करण्यात आले ते पोलिस ठाण्यात जप्त करण्यात आले होते. पंचनामा जागेवर केला की पोलिस ठाण्यात केला हे मला माहीत नाही.

**प्रश्न.** पोलिसांनी सांगीतले तेथे तुम्ही सही केली ?

**उत्तर.** जेव्हा त्या घरामध्ये गेलो तेव्हा तिथे होते.

२५. मी पोलिस ठाण्यात कागदावर सही केली. मी पोलिस ठाण्यात किती सहया केल्या हे मला आठवत नाही. घरामध्ये मी किती सहया केल्या हे मला आठवत नाही.

**प्रश्न.** घरामध्ये कोणत्या कोणत्या कागदावर सहया केल्या हे आठवत नाही?

**उत्तर.** झेरॉक्स पाहील्याचे आठवते. कोठे कोठे सहया केल्या आठवत नाही.

हे म्हणणे खरे नाही की, माझ्यासमक्ष कोणतीही गोष्ट जप्त करण्यात आले नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या कोठे कोठे सहया घेण्यात आल्या हे मला सांगता येत नाही. हे म्हणणे खरे नाही की, पोलिसांच्या सांगण्यावरुन मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, पोलिसांच्या सांगण्यावरुन व माझ्या सरकारी नोकरीवर आक्षेप येउ नये म्हणुन खोटी साक्ष देत आहे.

**२६.** आम्ही ज्या घरामध्ये गेलो होते ते घर कोणाच्या मालकीचे व ताब्यात आहे त्याबददल शहानिशा करण्यात आली नव्हती.

उलटतपास ०४.०५ मिनिटींनी संपला.

**फेरतपास नाही.**

**श्रवणोत्तर स्वीकृत**

Digitally signed by VIJAYA NARAYANRAO KATKAR
Date: 2024.09.03 10:43:29 +0530

**ठिकाण : कन्नड**
**दिनांक : ३१/०८/२०२४**

**(काटकर विजया एन.एस.)**
**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,**
**(न्यायालय क्र.३) कन्नड.**